महत्वाचे पत्र
(RKVY-RAD सन २०२४-२५:मार्गदर्शक सूचना)

जा.क्र.कृआ/कोक्षेवि/मासू/२४-२५/ /२४
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे -४११००५, दिनांक :२९/०७/२०२४

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक ( सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( सर्व )

विषय : राष्ट्रिय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) सन २०२४-२५ मध्ये अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना .....

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक शाशेअ-२०१४/प्र.क्र.८६/४-अे, दिनांक २१ एप्रिल २०१४.
२) केंद्र शासनाने पत्र क्र.F.No.४-२/२०१९-RFS-III (FTS-E७९५०३) GOI MoA&FW, DoA&FW (RFS Division) दि.२०/५/२०२४. (सुधारित कार्यकारी सूचना)
३) केंद्र शासनाने पत्र क्र.D.O.No.१३-२२/२०२३-PC GOI MoA&FW, DoA&FW दि.१४/१२/२०२३.
४) केंद्र शासनाने पत्र क्र.F.No.१३-४ / २०२३-PC GOI MoA&FW, DoA&FW (Policy & coordination Division) दि.४/३/२०२४
५) केंद्र शासनाने पत्र क्र.F.No.१७(०१)/२०२४-NRAA MoA&FW, DoA&FW (National Rainfed Area Authority) दि.४/४/२०२४
६) आयुक्तालयाचे पत्र क्र.कोक्षेवि/NICRA/प्र.क्र.२/३९५५/२३ दि.०५/०२/२०२४ (NICRA Villages)
७) केंद्र शासनाने पत्र क्र.F.No.१७(०१)/२०२४-NRAA MoA&FW, DoA&FW (National Rainfed Area Authority) दि.९/५/२०२४
८) शासन पत्र क्र. CSS-२०२४/C.R.१२/२-A, दि.१३/५/२०२४ (३५th SLSC Minutes)
९) आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/कोक्षेवि/ प्र.क्र.१/र-४१/२४ दि.१७/०५/२०२४
१०) शासन निर्णय क्र. राशेअ-४४२४/प्रा.क्र.१२७/८ अे, दि.२८/५/२०२४ (प्रशासकीय मान्यता)

केंद्र शासनाने राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानाचा (NMSA) एक घटक म्हणून कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) कार्यक्रम सन २०१४-१५ पासून कार्यान्वित केले आहे. राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) हा घटक केंद्र शासनाने सन २०२२-२३ पासून राज्यामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत अंतर्भूत केले आहे. संदर्भ क्र.२ अन्वये, केंद्र शासनाने दि.२०/५/२०२४ च्या पत्रान्वये कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेसाठी सुधारित कार्यकारी मार्गदर्शक सूचना (Operational Guidelines) निर्गमित केलेल्या आहेत. संदर्भ क्र. ३ अन्वये, केंद्र शासनाने योजनेसाठी सन २०२४-२५ मध्ये केंद्र हिस्स्याचा रक्कम रु.२२००.०० लाख रकमेची तरतूद केलेली आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत कोरडवाहु क्षेत्र विकास (RAD) योजनेंतर्गत सन २०२४-२५ साठीचा प्रलंबित दायित्वासह रु. ३६६६.६७ लाख रकमेच्या वार्षिक कृती आराखडा राज्यस्तरीय मंजुरी समिती (SLSC) च्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. त्यास संदर्भीय दि.१३/०५/२०२४ च्या इतिवृत्ताने मान्यता प्राप्त झाली आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात शासनाने संदर्भ क्र. १० च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रलंबित दायित्वासह रु.३६६६.६७ लक्ष रकमेच्या कार्यक्रमास (केंद्र हिस्सा रक्कम रु.२२००.०० लक्ष व राज्य हिस्सा रु.१४६६.६७ लक्ष) प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. जिल्हानिहाय आर्थिक उद्दिष्टे संदर्भ क्र.९ वरील पत्राव्दारे यापुर्वीच आपणास कळविण्यात आलेली आहेत. त्यानुसार क्षेत्रीय पातळीवर कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

### १) प्रस्तावना -

कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये शेती पद्धतीसह नैसर्गिक संसाधनाचा विकास आणि संवर्धन करण्यासाठी क्षेत्र आधारित प्रकल्प (Area based) हे धोरण स्वीकारले आहे. मृदा आरोग्य व्यवस्थापन, पावसाच्या पाण्याचा कार्यक्षम वापर, रसायनाचा योग्य वापर, पीक विविधीकरण आणि एकात्मिक पिक-पशुधन-वानिकी शेती पध्दतीचा एकत्रित वापर हा प्रमुख उद्देश आहे. यांतर्गत शेती आधारित उत्पन्न मिळवून देणारे दुय्यम कृषी उपक्रम आणि मूल्यवर्धनद्वारे पिके,फलोत्पादन,

पशुधन आणि मत्स्यपालन यांसारख्या विविध घटकांचा समावेश करून शेती पद्धती विकसित करणे. अभिसरणाद्वारे (Convergence) योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, स्थानिक तंत्रज्ञानास प्रोत्साहन देण्यासाठी आणि भविष्यात ह्या मॉडेलची प्रतिकृती मोठ्या क्षेत्रावर होण्याकरिता क्षेत्र आधारित प्रकल्प हा २० हेक्टरवर विकसित करावयाचा आहे. संसाधन व संवर्धन उपक्रम अभिसरणाच्या माध्यमातून पूरक सहाय्य देता येईल.

## २) उद्देश -

१. नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन आणि शाश्वत वापर, कृषी उत्पादन पद्धतीचे बळकटीकरण आणि उपजीविका विकास करिता योजनांचे एकत्रीकरण / अभिसरण याद्वारे क्षेत्र आधारित प्रकल्प धोरण सुनिश्चित करण्यासाठी कोरडवाहू भागात स्थान विशिष्ट आणि क्षेत्र आधारित धोरण अंमलबजावणी करणे.

२. शेती मध्ये स्थानिक एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करून शाश्वत, फायदेशीर, हवामान अनुकूल व कृषी उत्पादकता मध्ये वाढ करणे.

३. योग्य मृद व जल संवर्धनाद्वारे नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण करणे. हवामान बदल अनुकूलन क्षेत्रामध्ये राष्ट्रीय अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान, नॅशनल इनिशिएटिव्ह फॉर क्लायमेट रेझिलिएंट अग्रीकल्चर (NICRA) इत्यादी सारख्या अस्तित्वात असलेल्या योजनेच्या संयोगाने शेतकरी आणि भागधारकाची क्षमता विकसित करणे.

४. कोरडवाहू शेतीची उत्पादकता मध्ये वाढ करण्यासाठी अखिल **भारतीय** समन्वित संशोधन प्रकल्पांतर्गत (AICRPDA-NICRA) विकसित कोरडवाहू तंत्रज्ञानाचा अवलंब करणे. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS), PMKSY-WDC, NFNSM, RKVY, कृषी उन्नती योजना, SMAE, राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान इत्यादी सारख्या इतर योजना/ अभियान अंतर्गत केलेली संसाधने/तरतुदी यांचा लाभ देणे.

## ३) योजनेंतर्गत अंमलबजावणी धोरण (Strategy)-

योजनेचे खालीलप्रमाणे बहु-आयामी धोरण आहे.

१) पिके, पशुधन आणि वृक्ष लागवड (फलोत्पादन किंवा कृषी वानिकी) आधारित संमिश्र शेतीवर आधारित एकात्मिक शेती पद्धतीला प्रोत्साहन देणे, उपजीविकेच्या संधी वाढवणे, अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे आणि पुरक उत्पादन पद्धतीद्वारे पीक अपयशाचे धोके कमी करणे.

२) संसाधन संवर्धन तंत्रज्ञानाचा (शेतीवरील आणि शेताबाहेर दोन्ही) प्रसार करणे आणि हवामान बदल किंवा दीर्घकाळ दुष्काळ, पूर इ. सारख्या गोष्टी आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करणे.

३) पावसाच्या जलस्त्रोतांच्या प्रभावी व्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे आणि मागणी व पुरवठा व्यवस्थापनसह तंत्रज्ञान वापराद्वारे पाणी वापराची कार्यक्षमता वाढवणे.

४) क्षमता बांधणी, जागरूकता निर्माण करणे, माहितीचे समर्थन करणे, अभिसरणाद्वारे संसाधनाचा एकत्र वापर इत्यादीसाठी कृषी विस्तारावर भर दिला जाईल. कृषी विस्तार कार्यक्रमांद्वारे सुधारित कृषी पद्धतीसाठी क्षमता निर्माण करणे,अधिक कृषी उत्पादकता, सुधारित जमीन सुधारणा, पाणी धारण क्षमतेमध्ये वाढ, रसायने ऊर्जा, वर्धित माती कार्बन संचय इ. पद्धती योजनेच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

५) पौष्टिक तृणधान्ये पिके (Millete crops) ही मजबूतपणा (hardiness) आणि हवामानातील विकृतीला तोंड देण्याची क्षमता यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या भागात अपवादात्मकपणे चांगली ठरतात. २० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र नसलेल्या गावात किंवा क्षेत्रामध्ये क्लस्टर धोरण मध्ये उपलब्ध/तयार केलेल्या सामाईक संसाधनांच्या संभाव्यतेचा वापर व अवलंब करण्यासाठी समूहामध्ये किमान २५% क्षेत्र मिलेट पिकाच्या लागवडीखाली घेण्यात यावे.

६) विविध वनस्पतीच्या प्रजातीमुळे कार्बन संचयन क्षमता वाढते, कोरडवाहू क्षेत्र विकास पद्धतीमध्ये कार्बन संचयन करण्याची क्षमता साधारणपणे एक पिक पद्धती पेक्षा जास्त असते. त्यामुळे योजना अशा प्रकारे उदयोन्मुख कार्बन बाजारपेठेची व्याप्ती वाढविण्यात योगदान देते.

७) विशिष्ट कृषी हवामान परिस्थितीसाठी हवामान बदल अनुकूलन आणि शमन (Mitigation) धोरणे विकसित करण्यासाठी व योग्य शेती पद्धतीद्वारे त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध संस्था (Invoving knwoledge institutions) आणि

व्यावसायिकांचा समावेश करणे. ICAR द्वारे केलेल्या शिफारसी आणि NICRA प्रकल्पांतर्गत हवामान लवचीक शेतीवर विकसित तंत्रज्ञान देखील ह्या योजनेत एकत्रित करता येईल.

८) MGNREGS, PMKSY, RKVY, राष्ट्रीय अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान (NFNSM), एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH), कृषी यांत्रिकीकरण उपअभियान (SMAE) इ. सारख्या इतर योजना/अभियानामधून, अभिसरणाचा फायदा घेऊन वंचित भागात स्थानिक नियोजनातून पावसावर आधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून एकात्मिक विकासाकरिता जमिनीच्या क्षमतेचा आणि हवामानाच्या मापदंडांचा अनुकूल अवलंब करावा. विविध भागधारकांसह यामध्ये राज्य कृषी विद्यापीठ (SAUs), कृषी विज्ञान केंद्रे (KVKs), भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) संस्था, इतर व्यावसायिक शैक्षणिक संस्था जसे की DST, DBT इ. सारख्या ज्ञान भागीदारांसह एक सांघिक दृष्टिकोन विकसित केला जाईल.

९) देशातील सर्व शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड हे त्यांच्या जमिनीतील पोषक घटकांची माहिती देते आणि मातीचे आरोग्य आणि सुपीकता सुधारण्यासाठी लागू करावयाच्या पोषक घटकांची शिफारस करते. तसेच, शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात संस्थाकडून सुलभ कर्ज मिळण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड (KCC) योजनेला प्रोत्साहन देत आहे. कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम राबविताना मृदा आरोग्य कार्ड आणि किसान क्रेडिट कार्ड मिळविण्यासाठी RAD योजनेच्या लाभार्थींना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

### ४) योजनेंची ठळक वैशिष्टे (Intervension) :-

१. कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम हा ज्यात बहु-पीक, पिकांची फेरपालट, आंतर-पिकपद्धती, मिश्र-पिकपद्धती याबरोबर फलोत्पादन, पशुधन, मत्स्यव्यवसाय व मधुमक्षिकापालन इत्यादीद्वारे दुष्काळ परिस्थितीत शाश्वत उत्पादनाकरीता प्रोहत्सान देते.

२. ज्या भागात नैसर्गिक संसाधने विकसित झाली आहेत तेथे स्थानिक पिके, फळे, चारापिके, पशुधन, मत्स्यशेती, मधुमक्षिकापालन, मशरूम, औषधी व सुगंधी वनस्पती व इतर नफा देणाऱ्या घटकांना सहाय्य केले जाईल. तथापि शेततळे बांधकाम, जमीन सुधारणा, विहिरी, पंप, सूक्ष्म सिंचन, बियाणे व रोपे इत्यादींना अभिसरणाद्वारे लाभ देता येईल.

३. ज्यांना नियमित पिके/प्रणालीमध्ये इतर सुसंगत शेती घटक जोडायचे आहेत त्यांना समर्थन दिले जाईल, समर्थनासाठी पात्र होण्यासाठी शेती पद्धतीमधील पीक पद्धती व्यतिरिक्त किमान एक किंवा अधिक प्रमुख घटक/उपक्रम विलीनीकरण करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. या घटकातर्गत केवळ पीकपद्धतीला आधार दिला जाणार नाही. विद्यमान नैसर्गिक संसाधन मालमत्तेतून कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी स्थानिक KVKs, SAUs, ICAR संस्था, ICRISAT, ATMA इ. द्वारे समर्पित विशिष्ट इको-सिस्टमसाठी योग्य असलेली एक किंवा दुसरी पिक पद्धती निवडण्याचा शेतकऱ्यांकडे पर्याय उपलब्ध असेल.

### ५) प्रकल्प निवड :-

५.१) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) या घटकांतर्गत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे, घटक अंमलबजावणीचा दृष्यपरिणाम साधणे व भविष्यात व्यापक क्षेत्रावर हा घटक राबविण्याच्या दृष्टीने क्षेत्र आधारित (Area/Cluster based approach) धोरण स्वीकारलेले आहे. सन २०२४-२५ करीता प्रत्येक उपविभागातून दोन प्रकल्पांची निवड करण्यात यावी. त्यानुसार सन २०२४-२५ करिता सदर योजनेंतर्गत किमान २० हेक्टरचा एक समूह याप्रमाणे प्रकल्प आराखडे तयार करावयाचे आहे. सदर प्रकल्पामध्ये लाभ दयावयाचे क्षेत्र कमीत कमी २० हे असावे.

५.२) योजनेंतर्गत प्रकल्पांची (Cluster) निवड करताना खालील क्षेत्राना प्राधान्य देण्यात यावे : -

i) पावसावर आधारित ६०% पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या ग्रामपंचायती/तालुके (Blocks)
ii) नैसर्गिक शेती क्लस्टर्स
iii) WDC प्रकल्पांतर्गत गेल्या २० वर्षांत घेतलेल्या पाणलोट क्षेत्राला प्राधान्य
iv) ग्रामपंचायत / तालुके (Blocks) जे NRLM चे महत्वाचे क्षेत्र आहे.
v) NITI आयोगाने निवडलेले महत्त्वाकांक्षी तालुके (Blocks)
vi) NFSM कडधान्य/तेलबिया/ पौष्टीक तृणधान्ये पिके अंतर्गत निवडलेले जिल्हे आणि तालुके (Blocks)

५.३) केंद्र शासनाने कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमाची अंमलबजावणीकरिता सन २०२४-२५ च्या वार्षिक कृति आराखडा मध्ये प्रकल्पांतर्गत NICRA नजीकच्या गावांचा समावेश करणे करिता कृषी आयुक्तालयाचे दि.०५/०२/२०२४ रोजीच्या

पत्रान्वये आपणास सूचित केले आहे. सदर NICRA गावांची यादी खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे NICRA villages अथवा नजीकच्या गावांमध्ये प्राधान्याने अंमलबजावणी करावयाची आहे.

**महाराष्ट्रातील Nicra प्रकल्प अंतर्गत CRIDA ने निवडलेली गावे -**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | गावाचे नाव | गावांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | नेसदा, आडगाव बुद्रुक, खडकेवाके | ३ |
| २ | बीड | राजेवाडी, राक्षसवाडी | २ |
| ३ | जालना | कडेगाव , पोकळवागाव,पुणेगाव,वरुडी | ४ |
| ४ | लातूर | गुंफावाडी, इत्ती | २ |
| ५ | नंदुरबार | कात्री, रोशमाल,सुर्यापूर,उमराणी | ४ |
| ६ | धाराशिव | सारोळा | १ |
| एकूण | | | १६ |

५.४) ज्या गावामध्ये विविध पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत पाणलोट क्षेत्राची कामे पुर्ण झालेली आहेत अथवा चालू आहेत अशा गावांची प्राधान्याने निवड करावी. (Watershed area taken up under WDC project in last 20 yrs shall be given preference). केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या WDC-PKSY 2.० अंतर्गत मंजूर पाणलोट प्रकल्पांची (Watershed project) जिल्हानिहाय यादी यापूर्वी दि.१७/५/२०२४ रोजीच्या पत्रासोबत सहपत्रीत करून दिलेली आहे.

५.५) ज्या गावामध्ये यापूर्वी कोरडवाहू शाश्वत शेती विकास कार्यक्रम (RADP), कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) व कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रम (DLFM) या योजना राबविण्यात आलेल्या आहेत अशा गावांची निवड करण्यात येऊ नये. उपविभागातील ज्या तालुक्यांची सन २०१४-१५ ते २०२३-२४ मध्ये निवड करण्यात आली नाही. अशा तालुक्यातील गावांची प्राधान्याने निवड करावी.

५.६) प्रकल्प निवडतांना प्रकल्प निधी त्या वर्षी पूर्ण खर्च होईल अशा प्रकारे क्षेत्र व लाभार्थ्यांची निवड करावी. उपविभागात वरीलपैकी कोणतीही योजना राबविलेली नाही अशा तालुक्याची प्रथम निवड करावी. जर उपविभागातील सर्व तालुक्यात वरीलपैकी योजना राबविलेल्या असतील तर रोटेशन पध्दतीने तालुक्याची निवड करावी. उपविभागातून निवड केलेले प्रकल्प वेगवेगळ्या तालुक्यातील असतील याची दक्षता घ्यावी. उपविभागातील प्रकल्प निवड व प्रकल्पातील योजना अंमलबजावणीची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. त्याप्रमाणे निकषात बसणाऱ्या गावांची/प्रकल्पांची निवड करून प्रकल्पांची यादी तयार करण्यात यावी व त्याधारे जिल्हास्तरीय मंजुरी समितीची (DLC) मान्यता घेवून गावांची निवड अंतिम करण्यात यावी.

**(टीप:- केंद्र व राज्य शासनाकडून अनु.जाती / अनु.जमाती या प्रवर्गासाठी स्वतंत्रपणे निधी वितरीत केला जातो. सदर निधी त्या त्या प्रवर्गावरच खर्च करणे बंधनकारक आहे.त्यासाठी संबंधित प्रवर्गातील लाभार्थी असलेल्या गावांची निवड प्रकल्पासाठी करावी.)**

**६) कार्यक्षेत्र :-** कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेमध्ये राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांचा समावेश आहे.

७) लाभार्थी निवड -

७.१) अनु. जाती व अनु. जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतक-यांना प्राधान्य द्यावे.

७.२) केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रमाणानुसार प्रस्तावित निधीच्या १६% व ८% किंवा अनु.जाती / अनु.जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुक्रमे अनु. जाती व अनु. जमाती या प्रवर्गासाठी तरतूद करण्यात यावी.

७.३) लाभार्थ्याचे बँक खाते हे आधारशी जोडलेले असणे आवश्यक आहे.

७.४) लाभार्थी हा सध्याच्या प्रचलित पीक पध्दतीमध्ये बदल करुन एकात्मिक शेती पध्दतीतील बाबी राबविण्यास इच्छुक असणे आवश्यक आहे.

## ८) लाभार्थी अनुदान -

कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेंतर्गत समाविष्ट बाबीसाठी प्रति शेतकरी कुटुंबाला कमाल रक्कम रु. ३०,०००/- च्या मर्यादेत अनुदान देय आहे. याव्यतिरिक्त अधिकचा लाभ अभिसरणाच्या माध्यमातून देता येईल. याकरिता लाभार्थी शेतकऱ्याचे जमीन धारणा/शेतीचे क्षेत्र (Farm size) यांचे कोणतेही बंधन नाही. सदर अनुदानाची रक्कम सर्व शेतकऱ्यांसाठी त्याच्या जमिन धारणेचा आकार विचारात न घेता एकसमान असेल. त्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांसाठी कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेंतर्गत रक्कम रु.३०,०००/- या कमाल मर्यादेत प्रति शेतकरी कुटूंब अनुदान देय आहे.

## ९) RKVY-कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम या योजनेमधील समाविष्ट घटक :-

सदर योजनेंतर्गत एकात्मिक शेती पद्धती- शेतीपिके + झाडे + पशुधन, मूरघास युनिट / मत्स्योत्पादन युनिट/मधुमक्षिकापालन व क्षमता बांधणी या घटकांचा खालीलप्रमाणे प्रकल्पामध्ये समावेश करावयाचा आहे. तथापि खालील नमूद घटक/बाबी वगळून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार गांडूळखत युनिट/ सेंद्रिय निविष्ठा उत्पादने/हिरवळीचे खत निर्मिती व उर्वरित इतर घटक अभिसरणाच्या (Convergence) माध्यमातून प्रकल्पामध्ये समाविष्ट करता येईल. म्हणजेच योजनेंतर्गत कमाल रक्कम रु. ३०,०००/- प्रति शेतकरी कुटूंब कमाल अनुदान देय असून याव्यतिरिक्त अधिकचा लाभ अभिसरणाच्या माध्यमातून देता येईल.

**तक्ता क्र.१ : कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम (RAD)- घटक निहाय आर्थिक मापदंड तपशील**

| अ. क्र. | घटक/बाब | तपशिल | खर्चाचे प्रमाणक | अनुदान मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | **एकात्मिक शेती पद्धती (IFS)** | **शेतीपिके** (crops)- (पौष्टिक तृणधान्ये पिके /गळीतधान्य/ कडधान्य/ भाजीपाला/ चारापिके) + **झाडे** (Tree) - फळपिके /कृषी वानिकी + **पशुधन** (livestock) - {दुभती गाय/ म्हैस / १० शेळ्या, मेंढी / ५० कोंबडी ) | कमाल रु.१८,०००/- प्रति हे मर्यादेत | अ.क्र.१ मधील (शेतीपिके / झाडे / पशुधन) किमान दोन बाबी राबविणे अनिवार्य आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार जर शेतकरी सद्यस्थितीत एका शेती पद्धतीचा अवलंब करीत असल्यास त्याला उर्वरित अ.क्र.१ मध्ये नमूदपैकी एका घटकाचा लाभ देता येईल. त्याबरोबरच अ. क्र. २, ३, ४ व ५ मधील किमान २ बाबी राबविणे बंधनकारक आहे.<br>तथापि अ.क्र.५ मधील गांडूळखत युनिट/ सेंद्रिय निविष्ठा उत्पादने युनिट, हिरवळीचे खत निर्मिती घटकाचा समावेश अभिसरणाच्या माध्यमातून इतर योजनेमधून करावयाचा आहे. त्यामुळे RKVY-कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेंतर्गत कमाल रक्कम रु. ३०,०००/- प्रति शेतकरी कुटूंब कमाल अनुदान देय आहे. याव्यतिरिक्त अधिकचा लाभ अभिसरणाच्या माध्यमातून (convergence) देण्यात यावा. |
| २ | **मूरघास युनिट** (Silage unit) | **मूरघास युनिट** - १० प्लास्टिक पॉलिथिन बॅग + चाफकटर+ वजनकाटा | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% टक्के, कमाल रु.१२,०००/- प्रती युनिट | |
| ३ | **मत्सोत्पादन युनिट** (Fishery (Fingerlings) units) | **मत्सोत्पादन युनिट-** भात शेतीमध्ये मत्सोत्पादन (in ponds & rice field) | | |
| ४ | **मधुमक्षिका पालन** Apiculture (Bee keeping) | **मधुमक्षिका पालन-** फळपिके/मिलेट/ इतर शेती पिकांमध्ये प्रति शेत एक युनिट (one unit per farm under planteation/millets/Crops) | | |
| ५ | **गांडूळखत युनिट / सेंद्रिय निविष्ठा उत्पादने, हिरवळीचे खत निर्मिती** | गांडूळखत युनिट (Construction of vermicompost unit) / सेंद्रिय निविष्ठा उत्पादने युनिट, हिरवळीचे खते निर्मिती | अभिसरणाच्या माध्यमातून (convergence) | |
| ६ | **क्षमता बांधणी व मनुष्यबळ विकास** | महाराष्ट्र ग्रामिण जिवानोन्नती अभियान (SRLM), स्वयंसहायता गट (SHG), NF मधील उत्कृष्ट शेतकरी यांचे समुदाय संसाधन व्यक्ती (CRPs) मार्फत देखरेख आणि क्षमता बांधणी | रु. १०,०००/- प्रतिसमूह | रु. १०,०००/- प्रतिसमूह |
| ७ | **आकस्मिक खर्च** | .... | .... | क्षेत्रीय स्तरावर एकूण प्रकल्प खर्चाच्या १% निधी |

❖ RKVY-कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेंतर्गत समाविष्ट बाबींची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी —

**९.१) एकात्मिक शेती पध्दती (IFS) - शेतीपिके (Crops)+ झाडे (Tree) +पशुधन (livestock):-**

संदर्भ क्र.८ अन्वये, केंद्र शासनाने दि.०९/०५/२०२४ च्या पत्रान्वये सूचित केले आहे की, एकात्मिक शेती पद्धती अंतर्गत (IFS): **शेतीपिके** - (पौष्टिक तृणधान्ये पिके /गळीतधान्य/ कडधान्य/ भाजीपाला/ चारापिके) + **झाडे** - फळपिके /कृषी वानिकी + **पशुधन** - {दुभती गाय/ म्हैस / १० शेळ्या, मेंढी / ५० कोंबडी } " हे एकात्मिक शेती पद्धतीची रचना (Composition of integrated system) म्हणून समजले जाईल. परंतु यासाठी त्यामधील किमान दोन शेती पद्धतींचे संयोजन एकात्मिक शेतीसाठी पात्र ठरेल. जर एखादा लाभार्थी पूर्वीपासून फक्त एकाच शेती पद्धतीचे (शेती पिके/झाडे/पशुधन) पालन करत असेल व सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या शेती पद्धतीमध्ये वैविध्यता आणू इच्छित असेल तर, सध्याच्या एकात्मिक शेती पद्धती (IFS) सोबतच उपरोक्त तक्यामधील अ.क्र.१ मधील किमान एका पद्धतीचा अंतर्भाव करणे बंधनकारक आहे. म्हणजेच याप्रमाणे प्रती लाभार्थी किमान २ शेती पद्धतीचा समावेश करणे आवश्यक आहे.

उदा. प्रकल्पांतर्गत जर एखाद्या लाभार्थी शेतकऱ्याकडे शेतीपिके मधील पौष्टिक तृणधान्ये पिके/गळीतधान्य/कडधान्य/ भाजीपाला/ चारापिके ही बाब पूर्वीपासून/सद्यस्थितीत राबवीत असेल तर त्यास झाडे (Tree) किंवा पशुधन यापैकी दुसरी एक अनिवार्य बाब म्हणून राबवता येईल व त्या दुसऱ्या बाबीकरिता कमाल रु.१८,०००/- अनुदान वापरता येईल.

**९.१.१) शेतीपिके** - (पौष्टीक तृणधान्ये पिके /गळीत धान्ये/ कडधान्य/ चारापिके/ भाजीपाला ):

शेतीपिके अंतर्गत पौष्टीक तृणधान्ये पिके /गळीत धान्ये/ कडधान्य/ चारापिके/ भाजीपाला यासाठी सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पिक प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी ही प्रचलीत योजना / अभियान (उदा. अन्न आणि पोषण सुरक्षा (FNS) व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान इ.) च्या मार्गदर्शक सुचनानुसार व अनुदान मापदंडानुसार कार्यवाही करावयाची आहे. परंतु कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटकनिहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा. प्रत्येक प्रकल्पामध्ये एकात्मिक शेती पध्दती (IFS) या उपघटकांतर्गत प्रस्तावित करण्यात येणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी पौष्टीक तृणधान्ये (Millets)पिकाच्या लागवडीसाठी किमान २५ % क्षेत्रावर अवलंब करण्याची दक्षता घ्यावी.

**९.१.२) झाडे - फळपिके /कृषी वानिकी :**

या शेती पध्दतीमध्ये फळपिके किंवा कृषी वानिकी साठी अनुदान देय आहे.

❖ **झाडे -फळपिके अंतर्गत -**

➢ या घटकांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना या योजनेच्या प्रचलीत मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी करावी परंतु कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटक निहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा.

➢ भौगोलिक परिस्थितीनुसार फळझाडांची कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या वाणाची लागवड करावयाची आहे.

➢ या व्यतिरिक्त लागणारा इतर आवश्यक बाबीसाठीचा खर्च शेतकरी लाभार्थ्यांने स्वतः करावयाचा आहे. लाभार्थी शेतकऱ्याने यापूर्वी अन्य योजनेंतर्गत लाभ घेतला असल्यास सदर लाभ घेतलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी लाभार्थी पात्र असेल.

❖ **झाडे -कृषी वानिकी अंतर्गत -**

या पध्दतीमध्ये उपयोगी वृक्ष लागवड व चारा वृक्ष तसेच लाकूड व्यतिरिक्त इतर वन उत्पादने यांचा समावेश करावयाचा आहे. योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये तांत्रिक बाबीकरीता वन विभाग व सामाजीक वनीकरण विभागाकडील व इतर प्रचलीत योजनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी करावी परंतु कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटक निहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा.

९.१.३ पशुधन - दुधाळ गाय / म्हैस पालन / इतर पशुधन (शेळ्या-मेंढ्या पालन) / कुक्कुटपालन-

एकात्मिक शेती पध्दती विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी दुधाळ गायी / म्हशी किंवा इतर पशुधन (शेळ्या-मेंढ्या पालन ) किंवा कुक्कुटपालन यासाठी कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटक निहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा. तसेच योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये तांत्रिक बाबीकरीता पशुसंवर्धन विभागाकडील मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी करावी. तरी सदर बाबीकरिता खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत

१) दुधाळ गायी किंवा म्हशी जनावरांची किंमत याकरिता अनुदान देय राहणार आहे.

२) इतर पशुधन (शेळ्या-मेंढ्या पालन) आधारित शेती पध्दतीमध्ये शेतकऱ्यांनी १० शेळ्या-मेंढ्या (९ शेळ्या-मेंढ्या + १ बोकड/मेंढानर) यासाठी लाभार्थ्यास अनुदान देय आहे.

३) कुक्कुटपालन आधारित शेती पध्दतीमध्ये किमान ५० पक्षी यासाठी अनुदान देय आहे.

४) पशुधन खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीच्या पशुधनाचे व त्यांच्या सुविधांचे सर्वेक्षण करावे. गोठ्याचे व पशुधनाचे छायाचित्र घ्यावे व टिपण तयार करुन अहवाल तयार करावा व माहिती ठेवावी.

५) एका कुटुंबातील एकाच खातेदारास या योजनेचा लाभ देण्यात यावा. यापूर्वी लाभ दिलेल्या लाभार्थीस पुन्हा सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये.

६) दुधाळ गायी / म्हशी खरेदी व शेळया-मेंढ्या / कोंबडी खरेदी करिता खालीलप्रमाणे समिती राहील व सदर खरेदी ही लाभार्थीच्या पसंतीने करावी .

**दुधाळ गायी / म्हशी /शेळी-मेंढी / कोंबडी खरेदी समिती**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | उपविभागीय कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २. | तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| ३. | तंत्र अधिकारी,उ.वि.कृ.अ.,कार्यालय | सदस्य सचिव |
| ४. | मंडल कृषि अधिकारी | सदस्य |
| ५. | संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे प्रमुख | सदस्य |
| ७. | विमा प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | गट प्रमुख आणि लाभार्थी | सदस्य |
| ९. | बँक प्रतिनिधी | सदस्य |

७) वाटप केलेल्या एकूण दुधाळ जनावरांची /शेळया-मेंढ्या यांची प्रत्यक्ष पडताळणी १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी यांनी करावी.

८) या बाबी अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्याने विहित नमुन्यातील बंधपत्र करून देणे आवश्यक राहील. दुधाळ गायी किंवा म्हशी पालनासाठी लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे प्रारूप सोबत परिशिष्ट -२ अ मध्ये देण्यात आले आहे. तसेच शेळया-मेंढ्या /कुक्कुटपालनासाठी लाभार्थ्यांकडून घ्यावयाच्या बंधपत्राचे प्रारूप सोबत परिशिष्ट -२ ब मध्ये देण्यात आले आहे.

९) या बाबीअंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील उपविभागीय कृषि अधिकारी व संबंधित ग्राम पंचायत यांचेस्तरावर उपलब्ध करुन द्यावी. तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थीची नोंद पशुधनाच्या तपशीलासह स्वतंत्र नोंदवहीत घ्यावी.

१०) वरीलप्रमाणे खात्री करुन तालुका कृषि अधिकारी यांनी अनुदान अदायगीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे विहित पध्दतीने लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी शिफारस करावी.

**टीप-** योजनेंतर्गत अंमलबजावणीसाठी तांत्रिक बाबीकरीता वेगवेगळया प्रचलीत योजना / अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार कार्यवाही करावयाची आहे. त्यामध्ये वेळो वेळी होणारे बदल या योजनेसाठी लागू राहतील.

### ९.२) मुरघास युनिट :-

१) पशुधनाच्या हिरव्या चाऱ्याची गरज भागविणेसाठी मूरघास युनिट उभारण्यासाठी अनुदान देय आहे.

२) यामध्ये मुरघास निर्मितीसाठी एकूण १० सायलेज पॉलिथिन बॅग (क्षमता : ५०० कि.ग्रॅ.), चाफकटर व वजनकाटा यांचा समावेश आहे. यासाठीची खरेदी स्थानिक स्तरावर करण्यात येऊन प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% टक्के कमाल मर्यादेत परंतु कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटकनिहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा.

३) लाभार्थी शेतक-याने यापूर्वी या योजनेचा इतर कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थाकडून लाभ घेतलेला नसावा. निवडलेले प्रकल्प गावांतील लाभार्थ्यांकडे लहान-मोठी जनावरे असावीत. तसेच संकरीत व सुधारीत प्रजातीची जनावरे असणाऱ्या शेतकरी / पशुपालकास प्राधान्य देण्यात यावे.

४) मुरघास युनिट ची प्रत्यक्ष तपासणी /पडताळणी १०० टक्के मंडल कृषि अधिकारी, २५ टक्के तालुका कृषि अधिकारी, १५ टक्के उपविभागीय कृषि अधिकारी व ५ टक्के जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी यांनी करावी.

### ९.३) मत्सोत्पादन युनिट :-

मत्सोत्पादन युनिटसाठी तलाव मध्ये किंवा भात शेतीमध्ये मत्सोत्पादन याचा समावेश राहील. योजनेंतर्गत अंमलबजावणीमध्ये मत्स्य व्यवसाय विभाग कडील मार्गदर्शक सुचनानुसार किंवा इतर प्रचलीत योजना / अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी करावी परंतु कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) योजनेच्या घटक निहाय आर्थिक मर्यादेच्या (उपरोक्त तक्ता क्र.१ प्रमाणे) अधीन राहून खर्च करण्यात यावा.

### ९.४) मधुमक्षिकापालन :-

शेतक-यांनी फळे / फुले किंवा पीक आधारित शेती पध्दतीमध्ये मधुमक्षिका पालनाचा पूरक व्यवसाय सुरू केल्यास त्याला परागीकरणाच्या माध्यमातून पीक उत्पादन वाढीबरोबरच मधापासून आधिकचे उत्पन्न प्राप्त होईल. यासाठी सदर बाबी अंतर्गत शेतीपिके /पौष्टिक तृणधान्ये पिके /इतर पिकांमध्ये प्रती शेत एक युनिट असा अवलंब करावयाचा आहे. यासाठी मधुमक्षिका वसाहत व मधुमक्षिका संचवाटपाबाबत सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

१) राज्यात मधुमक्षिकापालन योजनेंतर्गत राज्य पदनिर्देशित प्राधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या किंवा मंडळ स्तरावरुन मान्यता दिलेल्या स्थानिक कारागिरांमार्फत मधुमक्षिका संच घेणे बंधनकारक राहील.

२) एका लाभार्थ्यास मधुमक्षिका संचाच्या खर्चाच्या एकूण मापदंडाच्या रु.२०००/- प्रति पेटी याच्या ४० % कमाल रु.८००/- प्रति मधुमक्षिका संच यामर्यादेत, जास्तीत जास्त १५ मधुमक्षिका संच प्रति लाभार्थी अनुदान देय आहे. एका मधुमक्षिका संचामध्ये ८ खणांची चौकट व राणी माशीसह मधमाशांच्या पोळ्याकरीता सदरचे अनुदान देय राहील.

३) वाहतूक, पॅकिंग,मजूरी, आकस्मिक खर्च ई.साठी येणारा जास्तीचा खर्च लाभार्थ्यास करावा लागेल.

४) पेटीचे आकारमान व इतर तपशिल तसेच स्थानिक पूरवठादारांची यादी याबाबत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) किंवा इतर मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात.

५) मधुमक्षिकापालन बाबीसाठी लाभार्थी निवडीचे निकष -

५.१) लाभार्थी शेतकऱ्याकडे मधुमक्षिकापालन क्षेत्रात शेतीपिके /पौष्टिक तृणधान्ये पिके इ. पिकाची लागवड असावी. नसल्यास बांधावर लागवड करण्यात यावी जेणेकरुन, मधमाशांना नियमित व पुरेसा अन्नपुरवठा उपलब्ध होऊ शकेल.

५.२) या घटकांतर्गत एका लाभार्थ्यास कमाल १५ मधुमक्षिका संचाच्या मर्यादेत लाभ देय आहे.

५.३) या घटकांतर्गत एका लाभार्थ्यास फक्त एकदाच लाभ देण्यात यावा. यापूर्वी या बाबीसाठी इतर योजनांतून लाभ घेतलेला नसावा.

५.४) या योजनेअंतर्गत ठरवून दिलेली खर्च प्रमाणके ही लाभार्थी शेतक-यांस मंजूर असतील व निश्चित केलेल्या खर्चापेक्षा अधिक खर्चाची जबाबदारी लाभ धारक शेतक-याला स्वखर्चातून करावी लागेल.

५.५) ज्या क्षेत्रात मधुमक्षिकापालन करावयाचे आहे त्या परिसरात रासायनिक कीटकनाशकांचा वापर अत्यंत माफक असावा व मधुमक्षिका पालनास हानीकारक ठरणार नाही अशाच कीटकनाशकांचा वापर करणे गरजेचे आहे. याबाबत लाभार्थी शेतकऱ्यांना प्रशिक्षित करावे.

### ९.५) गांडुळ खत युनिट/ सेंद्रिय निविष्ठा उत्पादने, हिरवळीचे खत निर्मिती :-

गांडूळखत युनिट/ सेंद्रिय निविष्ठा उत्पादने, हिरवळीचे खत निर्मिली हा घटक राज्यस्तरीय समितीच्या (SLSC) संदर्भीय दि.१३/०५/२०२४ मधील सूचनानुसार इतर योजनामधून अभिसरणाच्या च्या माध्यमातून प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावे. त्यासाठी संबंधित योजनांच्या मापदंडा नुसार अनुदान देय राहील. तथापि सदर घटका करिता कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेंतर्गत अनुदान देय असणार नाही, याची नोंद घ्यावी.

**उपरोक्तप्रमाणे मुद्दा क्र. ९.२, ९.३, ९.४ व ९.५ यामधील किमान २ बाबी राबविणे आवश्यक आहेत. प्रकल्पांतर्गत जर लाभार्थी शेतकरी हा गांडुळ खत युनिट इतर योजनामधून अभिसरणाच्या माध्यमातून घेत असेल तर उपरोक्त मुद्दा क्र. ९.२, ९.३, ९.४ यामधील एक बाब राबविण्याकरिता कमाल रु.१२,०००/- अनुदान देय आहे. मात्र, जर लाभार्थी शेतकरी गांडूळखत युनिट ही बाब राबवित नसेल तर मुद्दा क्र. ९.२, ९.३, व ९.४ मधील किमान दोन बाबी राबविणे बंधनकारक आहे.**

### ९.६) क्षमता बांधणी व मनुष्यबळ विकास :-

यासाठी योजनेंतर्गत निवड केलेल्या समूह आधारित प्रकल्पांमध्ये एक क्षेत्रस्तरीय समन्वयक निवडून प्रकल्पाची अंमलबजावणी करावयाची आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामिण जिवानोन्नती अभियान (MSRLM), स्वयंसहायता गट (SHG)मधील संसाधन व्यक्ती (CRPs), नैसर्गिक शेती (NF) कार्यक्रममधील उत्कृष्ट शेतकरी अशा व्यक्तीची समुदाय संसाधन व्यक्ती (CRPs) म्हणून निवड करावयाची आहे. समुदाय संसाधन व्यक्तीने (CRPs) प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांमध्ये समन्वय ठेवणे, लाभार्थी निवडीबाबत सहाय्य, जागरुकता निर्माण करणे, सहभागी शेतकऱ्यांची क्षमता बांधणी करणे, आवश्यक्तेनुरूप लाभार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे तसेच क्षेत्रीय स्तरावरील शासकीय यंत्रणेला आवश्यकतेनुसार सहाय्य करावयाचे आहे. त्यासाठी प्रत्येक प्रकल्पांतर्गत रक्कम रु. १०,०००/- प्रति प्रकल्प खर्च प्रमाणक तरतूद राहील.

### ९.७) आकस्मिक /संकीर्ण खर्च :-

प्रकल्प अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावर एकूण प्रकल्प खर्चाच्या १% निधी आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध असेल. त्यातून शेतकरी यशोगाथा तयार करणे व इतर अनुषंगिक खर्चासाठी संकीर्ण तरतूद करण्यात आली आहे.

### १०. अभिसरणाद्वारे इतर योजना/प्रकल्पांबरोबर कार्यक्रमाची सांगड :-

पाणलोट विकास कार्यक्रम , राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान , राष्ट्रीय खाद्यतेल-तेलबिया अभियान, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ,राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, कृषी यांत्रिकीकरण उपअभियान इ. योजनांचे माध्यमातून शेतकऱ्यांना उपजीविकेच्या अतिरिक्त संधी उपलब्ध करून देणारी एकात्मिक शेती पद्धती तयार करता येईल.

### ११. संनियंत्रण आणि मुल्यमापन :

११.१ जिल्हा स्तरावर सदर अभियान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत राबविण्यात येणार आहे. त्यासाठी संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये अभियानाच्या अंमलबजावणी व सनियंत्रणाकरीता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समिती (DMC) स्थापन करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय मंजूरी समितीने मान्यता दिलेले वार्षिक कृती आराखडे (AAP) केंद्र शासनाच्या NMSA - RAD पोर्टलवर भरण्यात यावेत.

११.२ Geo-Tagging of land based intervention: प्रकल्प क्षेत्र/ भौतिक निर्मित बाबी अंतर्गत लाभार्थीचे नाव, दिलेले अनुदान इत्यादीवर स्थान विशिष्ट Geo-Tagging चा वापर करून देखरेख आणि मूल्यमापन (M&E) करण्यात येणार आहे. सर्व स्थान विशिष्ट घटकांचे देखरेख प्रणालीद्वारे Geo-Tagging करण्यात यावे. केंद्र शासनाने कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) कार्यक्रम अंतर्गत लाभ दिलेल्या घटकांचे संनियंत्रण व Geo-tagging/Mapping/Geo-fencing करणेकरिता

Krishi-MApper Platform हे geo-special web व mobile application platform विकसित केले आहे. त्यानुसार लाभ दिलेल्या घटकांचे Krishi-MApper Mobile application द्वारे Geo-tagging/Mapping /Geo-fencing करावयची कार्यवाही करावी. याकरीताचे login credentials आपणास उपलब्ध दिलेले आहे. त्यानुसार आपले अधिनिस्त अधिकारी/ कर्मचारी यांचे login credentials तयार करावेत व आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

११.३ कोरडवाहू क्षेत्र विकास *(RAD)* घटकांतर्गत जिल्हयांना जिल्हानिहाय वितरीत केलेल्या निधीचा तपशील उदा.उपयोगिता प्रमाणपत्र, मासिक प्रगती अहवाल मुदतीत पाठविण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

११.४ योजने अंतर्गत मासिक प्रगती अहवाल (भौतिक आणि आर्थिक) विहित प्रपत्रात परिशिष्ट-४ अ व इतर योजनांच्या अभिसरणाच्या (Convergence) माध्यमातुन लाभ दिला असेल तर परिशिष्ट-४ ब मध्ये घटकनिहाय दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयुक्तालयास सादर करण्यात यावा. तसेच प्रवर्गनिहाय भौतिक आणि आर्थिक उपलब्धी आणि महिला घटकांची माहिती परिशिष्ट- ६ मध्ये दिलेल्या प्रपत्रामध्ये वेळोवेळी द्यावी.

११.५ योजना अंबलबजावणी व निधी मुक्ततेच्या दृष्टीने प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र शासनास प्रत्येक तिमाही नंतर सादर करावी लागतात त्यासाठी अंमलबजावणी प्रगतीबाबत जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च तिमाहीची त्रैमासिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे जिल्ह्यांनी पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत विभागीय कृषी सह संचालक मार्फत आयुक्तालयास सादर करावी.

११.६ या कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी विविध घटकांच्या अंमलबजावणी पुर्वीचे आणि नंतरचे फोटो / व्हिडिओ शुटींग करण्यात यावे. तसेच योजनेंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापील/डिजिटल स्वरुपात तयार करून आयुक्तालयास सादर कराव्यात.

## १२. अपेक्षित परिणाम :

कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम मध्ये एकात्मिक शेती पद्धती अंतर्गत समाविष्ट क्षेत्र वाढल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. पावसावर अवलंबून असलेल्या कृषी क्षेत्राचे हवामानातील बदलासाठी अधिक संवेदनशील क्षेत्रे यासाठी योग्य अनुकूलन आणि धोके कमी करण्याच्या उपायांद्वारे अधिक हवामान प्रतिरोधक उत्पादन प्रणालीमध्ये रूपांतरित करणे अपेक्षित आहे. फलोत्पादन, पशुधन, मधुमक्षिका पालन आणि मत्स्यपालन यासह शेती पद्धतीचे एकत्रीकरण केल्याने हवामानातील असामान्य स्थितीत शेतकऱ्यांना उत्पन्नाची सुरक्षा मिळेल. पौष्टिक तृणधान्ये पिके (Millets) ही हवामानाला अनुकूल पिके असून, योजनेंतर्गत त्याच्या लागवडीला चालना दिल्याने पौष्टिक तृणधान्ये पिकाचे क्षेत्र आणि उत्पादनात वाढ होईल.

## १३. प्रकल्प मुल्य व सविस्तर प्रकल्प आराखडा :-

सन २०२४-२५ करीता, संदर्भ क्र. ९ अन्वये प्रस्तावित जिल्हानिहाय प्रकल्प संख्या व जिल्हानिहाय आर्थिक लक्षांक प्रपत्र - १ मध्ये यापूर्वी देण्यात आलेला आहे. जिल्हास्तरावरुन नमुद प्रकल्प संख्येनुसार आर्थिक लक्षांकाच्या आधीन राहून वार्षिक कृति आराखडे तयार करणेबाबत सूचित केले आहे. जिल्हयातील निवडलेल्या प्रत्येक प्रकल्पाचे प्रकल्प मुल्य समान असणे बंधनकारक नाही. **मात्र, प्रत्येक प्रकल्पाचे मुल्य साधारणतः रक्कम रु. १४.१० लाख या मर्यादेत असावे.** केंद्र शासनाच्या सूचनानुसार जिल्हानिहाय अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील खातेदार संख्येच्या प्रमाणात जिल्हानिहाय निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तालुका / गावांची निवड करतांना शक्यतो जिल्हयातील अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती बहुल तालुके व गावांची प्राधान्याने निवड करावी.

१३.१) प्रकल्प क्षेत्र हे किमान २० हेक्टर क्षेत्राचा समूह याप्रमाणे समूह आधारित प्रकल्प ची निवड करावी. परंतु अपवादात्मक परिस्थितीत प्रकल्पासाठी कठीण भूप्रदेशात संलग्न असलेल्या गावात/लगतच्या गावामध्ये प्रकल्पाची निवड करता येईल. प्रत्येक प्रकल्पासाठी संपूर्ण गावाचे क्षेत्र निवडण्यात यावे. प्रत्येक प्रकल्पासाठी रू.१४.१० लाख मर्यादेत (व्यवस्थापन खर्च वगळून) निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रकल्प आराखडे तयार करावेत.

१३.२) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) अंतर्गत ICAR द्वारे शिफारस केलेल्या शेती पद्धती व NICRA प्रकल्पाच्या यशस्वी निष्कर्षाचाही एकात्मिक सविस्तर प्रकल्प आराखडयामध्ये विचार करावा. तथापि, कोणत्याही एकाच उपघटकावर मोठया प्रमाणात निधी प्रस्तावित करु नये.

१३.३) कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) साठी निवडण्यात आलेल्या सर्व प्रस्तावित प्रकल्पांतर्गत गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे मंडळ कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांच्या सहाय्याने संबंधित उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांनी तयार करावेत.

१३.४) सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक प्रपत्र परिशिष्ट-५ यापुर्वी सन २०१६-१७ च्या मार्गदर्शक सुचनामध्ये उपलब्ध करुन दिलेले आहे. प्रकल्पनिहाय वार्षिक कृति आराखडा सोबत जोडलेल्या परिशिष्ट -५ अ नुसार तयार करण्यात यावा. त्यानुसार प्रत्येक प्रकल्पाचा आराखडा तयार करावा. जिल्हयाचा वार्षिक कृति आराखडा सर्व प्रकल्पांचे एकत्रिकरण करुन परिशिष्ट -५ ब नुसार तयार करून कृषि आयुक्तालयास सादर करावा.

१३.५) सविस्तर प्रकल्प आराखडा प्रपत्रातील माहिती भरताना ती अचूक व स्वयंस्पष्ट असेल याची खात्री करावी.

१३.६) निवडलेल्या प्रकल्पांतर्गत गावांमध्ये बैठकीचे आयोजन करुन कोरडवाहू क्षेत्र विकास व त्यातील समाविष्ठ घटकाबाबत सविस्तर माहिती तालुका कृषि अधिकारी यांनी ग्रामस्थांना द्यावी.

१३.७) सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करताना लाभार्थी शेतकरी हा केंद्र बिंदू ठरविण्यात यावा. वैयक्तिक लाभार्थी कार्यक्रम प्रस्तावित करण्यापूर्वी, संबंधित लाभार्थी कुटुंबाशी चर्चा करावी व त्यांचेकडून विहित प्रपत्रातील अर्ज भरून घ्यावा. लाभार्थी अर्जाचा नमुना परिशिष्ट-२ मध्ये दिलेला आहे.

१३.८) गावाचा प्रकल्प आराखडा तयार करताना, पायाभूत सर्वेक्षणाच्या आधारावर गावाची सविस्तर माहिती आराखडयात भरावी.

१३.९) प्रकल्प आराखडयात कोरडवाहू क्षेत्र विकास या घटकातून प्रकल्पामध्ये प्रस्तावित करावयाच्या बाबी तसेच इतर योजनांचे एकत्रिकरण यातून प्रस्तावित करावयाच्या बाबी स्वतंत्रपणे नमूद कराव्यात.

१३.१०) उपविभागीय कृषि अधिकारी यांनी, तयार केलेले गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावेत.

१३.११) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रत्येक गावाच्या सविस्तर प्रकल्प आराखडयाची छाननी करुन आराखडे योग्य असल्याबाबत खात्री करुन, जिल्हास्तरीय अभियान समिती (DMC) च्या मान्यतेसाठी सादर करतील.

१३.१२) जिल्हास्तरीय अभियान समितीने (DMC) मान्यता दिलेले आराखडे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास व कृषि आयुक्तालयास सादर करावेत. विभाग स्तरावर प्राप्त आराखड्याचे संकलन करून मूळ प्रकल्प आराखड्यांच्या प्रतींसहित कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

१३.१३) जिल्हास्तरीय मंजूरी समितीने मान्यता दिलेले वार्षिक कृती आराखडे केंद्र शासनाच्या NMSA - RAD पोर्टलवर भरण्याची जबाबदारी जिल्हास्तरीय समन्वय अधिकाऱ्याची राहील. जिल्हास्तरीय समन्वय अधिकाऱ्यांनी तंत्र अधिकारी / कृषि अधिकारी यांच्या मदतीने सदर कार्यवाही करावी. तसेच मागील वर्षीचा अंतिम आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल व लाभार्थी संख्या (beneficiaries count) तपशील NMSA-RAD पोर्टल वर भरण्यात यावेत.

## १४. कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) कार्यक्रम अंमलबजावणी साठी अधिका-यांच्या कर्तव्ये व जबाबदा-या :-

**१४.१** या कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी राज्यस्तरावर कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), विभाग स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभाग स्तरावर उपविभागीय कृषि अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

**१४.२ तालुका कृषि अधिकारी व निवड केलेल्या गावाशी संबंधित प्रकल्प कार्यान्वयन पथक** (Project Implementing Team) **(मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक) यांचेवर प्रकल्पाच्या अंमलबजावणीची खालील प्रमाणे जबाबदारी राहील**

- गावाचे पायाभूत सर्वेक्षण (Baseline-Survey) करीत असताना ग्राम सभेस उपस्थित राहून क्षेत्रिय कर्मचा-यांना आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन करणे.
- गावाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार करताना कृतिशील सहभाग घेणे.

* तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल(DPR) मंजूरीसाठी सादर करणे.
* मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार विविध बाबींची अंमलबजावणी वेळेवर करण्यासाठी बाब निहाय अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे.
* या घटकाचे सुरवातीपासून व्हिडीओ शूटिंग व फोटोग्राफी करणे व सदर घटकाची यशोगाथा तयार करणे.
* प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.
* विहीत प्रपत्रातील मासिक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समयमर्यादेत सादर करणे.

१४.३ **उपविभागीय कृषि अधिकारी हे कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) प्रकल्प समन्वयक (PC) म्हणून काम पहातील.** त्यांनी उपविभागात निवड केलेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी, सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करावे. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करावे.

**१४.४ जिल्हास्तरावर या घटकाच्या समन्वय आणि सनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांची राहील. त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदारी पार पाडावी.**

* सविस्तर प्रकल्प अराखडे तयार करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचा-यांना मार्गदर्शन करणे आणि इतर विभागाच्या योजनाचा समावेश करण्याबाबत जिल्हास्तरीय अधिका-यांशी समन्वय ठेवणे.
* प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची छाननी करुन जिल्हास्तरीय अभियान समिती (DMC) च्या मान्यतेसाठी सादर करणे.
* मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार जिल्हयातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करणे आणि त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत संनियत्रण करणे.
* जिल्हास्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे.
* विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादेत सादर करणे.
* प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

**१४.५ विभाग स्तरावर या घटकाचे संपूर्ण समन्वय आणि सनियंत्रण विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करावयाचे असून त्यांनी पुढील प्रमाणे जबाबदा-या पार पाडाव्यात.**

* विभाग स्तरावरुन सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्याबाबत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना मार्गदर्शन करणे.
* प्राप्त सविस्तर प्रकल्प आराखडयांची तपासणी करुन ते विभागीय कृषि सहसंचालक यांच्या अवलोकनार्थ सादर करणे. विभागातील सर्व जिल्हानिहाय आराखड्यांचे संकलन करून त्याचा गोषवारा कृषि आयुक्तालयास सादर करणे.
* मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयानुसार विभागातील प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्रमाची समयबध्द आखणी करणे व त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीचे सनियंत्रण करणे.
* अभियानासंबंधी विभाग स्तरावरील नोंदवहया आणि अभिलेख अद्ययावत ठेवणे.
* विहीत प्रपत्रातील नियतकालीक अहवाल वरिष्ठ कार्यालयास समय मर्यादित सादर करणे.
* अभियानातील विविध घटकांसाठी दिलेल्या अनुदानाचे वित्तीय संनियत्रण व पर्यवेक्षण करणे.
* प्रकल्प अंमलबजावणीनुसार लाभ दिलेल्या लाभार्थी माहितीच्या नोंदवहया व आवश्यक अभिलेख जतन करणे.

## १५. RKVY-कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) अंमलबजावणी करीता सर्वसाधारण सूचना -

